AH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Issue-43, Vol-05, July to Sept. 2022

# Vidyawarta®

Peer Reviewed Research Journal

Editor
Dr.Bapu G. Gholap

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

July To Sept. 2022
Issue 43, Vol-05

Date of Publication
01 August 2022

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# Editorial Board & review Committee


- **Chief Editor**

**Dr Gholap Bapu Ganpat**
Parli_Vaijnath,Dist. Beed Pin-431515 (Maharashtra)
9850203295, 7588057695
vidyawarta@gmail.com

- **M.Saleem**

saien Ghulam street
Fatehgarh Sialkot city
Pakistan. Phone Nr. 0092 3007134022
saleem.1938@hotmail.com

- **Dr. Momin Mujtaba**

Faculty Member,Dept. of Business Admin.
Prince Salman Bin AbdulAziz University
Ministry of Higher Education,Kingdom of Saudi Arabia, Tel No.: +966-17862370 Extn: 1122

- **N.Nagendrakumar**

115/478, Campus road,
Konesapuri, Nilaveli ( Postal code-31010),
Trincomalee, Sri Lanka
nagendrakumarn@esn.ac.lk

- **Dr. Vikas Sudam Padalkar**

vikaspadalkar@gmail.com
**Cell.** +91 98908 13228 (India),
+ 81 90969 83228 (Japan)

- **Dr. Wankhede Umakant**

Navgan College, Parli –v Dist. Beed
Pin 431126 Maharashtra
Mobi.9421336952
umakantwankhede@rediffmail.com

- **Dr. Basantani Vinita**

B-2/8, Sukhwani Paradise,
Behind Hotel Ganesh, Pimpri,
Pune-17 Cell: 09405429484,

- **Dr. Bharat Upadhya**

Post.Warnanagar, Tq.Panhala,
Dist.Kolhapur-4316113
Mobi.7588266926

- **Jubraj Khamari**

AT/PO - Sarkanda, P.S./Block - Sohela
Via/Dist. - Bargarh, Pin - 768028 (Orissa)
Mob. No. – 09827983437
jubrajkhamari@gmail.com

- MISS. VARSHA ANILRAO TIDKE

FULE-AMBEDKAR COLLEGE OF SOCIAL WORK,
HANUMAN NAGAR, REVENUE COLONY, GADCHIROLI
9421857700
varshaatidke21@gmail.com

- **Dr Trushna S Kalambe**

66 Ayodhyanagar behind
sai Mandir lane no 2 Nagpur-440024

- **Dr. Ambhore Shankar**

Jalna,Maharashtra
shankar296@gmail.com
Mobi.9422215556

- **Dr. Sumit Prasad**

Professor Colony, Kankarbagh,
PO – Lohia Nagar,Patna – 800 020 (Bihar)
prasadsumit78@gmail.com

- **Prof. Surwade Yogesh p**

Dept. Of Library, Dr B A M U Aurangabad , Pin 431004
**Cell No:** +919860768499
yogeshps85@gmail.com

- **Dr.Deepak Vishwasrao Patil,**

At.Post.Saundhane, Near
Kalavishwa Computer, Tq.Dist.Dhule-424002.
Mobi. 9923811609
patildipak22583@gmail.com

- **Dr.Vidhya.M.Patwari**

Vanshree Nagar,Behind Hotel
Dawat, Mantha Road, Jalna-431203
Mobi.9422479302
**patwarivm@rediffmail.com**

- **Dr. Varma Anju**

Assistant Professor, Dept. of Education,
Sikkim University 6th Mile, Samdur Tadong-737102
GANGTOK - Sikkim, (M.8001605914)
anjuverma2009@rediffmail.com

- **Dr. Dinesh Kumar Charan**

Associate Professor and HOD-History Dept.,
Govt.Lohia College Churu (Rajasthan) India
Pin- 331001
**Mob. No.-9414305804**

# INDEX

01) National Education Policy 2020
**Abhishek H E & Dr.Santhosh Kumar P K, Gadag** ||10

02) Study on Some Ethno medicinal Plants used to Rituals
**Dr. Anita Jeph, Jhunjhunu, Rajasthan, India** ||16

03) THE IMPORTANCE OF PALI AND SANSKRIT IN BUDDHISM
**CHARMAREE TANGKASIKIT, MEERUT, U.P.** ||18

04) Contribution of pâ7□i and Sanskrit to Buddhism
**Miss HlaTin, Meerut, Uttar Pradesh** ||22

05) FOOD PROCESSING INDUSTRY IN INDIA
**Ms. Vidula Ramchandra Katkamwar & Dr. Ronil K. Ahale, Dist. – Akola** ||27

06) Reducing Unemployment through on education Movement
**MOHAMMAD. AZRA SHAREEN, ASIFABAD, TELANGANA** ||32

07) The Principal : Qualities, Duties and Responsibilities
**Prajapati Jigneshkumar B., Godhra** ||33

08) AGRICULTURE MARKETING
**Dr. Ashok Namdev Sasane, Dist- Pune** ||37

09) ASSISTIVE TECHNOLOGY (AT) FOR VISUALLY IMPAIRED (VI) IN KOTA PUBLIC ...
**SAGIRU BALA MUSA & DR. DEEPAK KUMAR SHAVARASTAVA, Kota, Rajasthan** ||40

10) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावरील आक्षेप आणि वास्तविकता
**श्री. औताडे लक्ष्मण बाबा** ||47

11) कळमनुरी तालुक्यातील माध्यमिक शाळेतून दिल्या जाणाऱ्यात शारीरिक ...
**डॉ. बाशेट्टी एस.डी., जि. हिंगोली** ||49

12) भारत आणि अलिप्ततावादी संघटना
**डॉ. शिवाजी गोविंदराव दिवाण, जि. बीड** ||52

13) शास्त्रीय संशोधनाच्या पायऱ्या
प्रा.हंबीर राजू मारोती, जि.लातूर ||56

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

**12**

# भारत आणि अलिप्ततावादी संघटना

**डॉ. शिवाजी गोविंदराव दिवाण**
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
महिला महाविद्यालय, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड

***********

**अलिप्तवाद :**

अलिप्तवाद म्हणजे, तटस्थता नाही, जागतिक राजकारणापासून अलिप्त राहणे म्हणजे अलिप्तवाद नाही. अलिप्तवाद म्हणजे, एखाद्या प्रश्नांच्या गुण-दोषांची किंवा सत्य-असत्याची पडताळणी करून, योग्य तो निर्णय घेणे. अलिप्तवादाचा मुख्य भर हा निर्णय निर्मितीमध्ये स्वायत्तता टिकविण्यावर आहे. अलिप्ततावाद म्हणजे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात लष्करी स्वरूपाच्या व गटातटाच्या राजकारणापासून अलिप्त राहणे म्हणजे अलिप्ततावाद होय.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू भारताच्या अलिप्ततावादी धोरणाचे स्पष्टीकरण करताना म्हणतात की, कोणत्याही राष्ट्राचे अंकित म्हणून न राहता, आम्ही एक स्वतंत्र राष्ट्र या नात्याने आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये भाग घेऊ, आम्ही सत्तागटाच्या राजकारणापासून अलिप्त राहू इच्छितो. अमेरिका, रशिया या महासत्तांच्या गटामध्ये सहभागी न होता, जागतिक व्यासपीठावर भारतास सन्मानाचे स्थान मिळविता येईल. एक विधायक क्रियाशील व निश्चित स्वरूपाचा नीतीप्रवाह म्हणून अलिप्ततावादी धोरणास महत्त्व आहे.

**अलिप्ततावादाच्या व्याख्या :**

**१) युनू :** अलिप्ततावाद म्हणजे शीतयुद्धातील तटस्थता होय.

**२) पीटर लायन :** राजकीय तटस्थता म्हणजे दोन गटांमध्ये जेव्हा भांडण होत असते, तेव्हा तिसरा त्यांच्यापैकी कोणाचीही बाजू न घेण्याचे धोरण ठरविणे म्हणजे अलिप्तता होय.

**३) श्वर्तनबर्जर :** अलिप्ततावाद म्हणजे संधीपासून दूर राहण्याचे धोरण होय.

अनेक प्रकारच्या धोरणांपैकी अलिप्तता हे एक धोरण आहे. आंतरराष्ट्रीय राजकीय गटांपासून व लष्करी संघटनांपासून अलग राहणे म्हणजे, अलिप्तता होय. अलिप्ततेच्या धोरणांचे प्रवर्तक पंडित जवाहरलाल नेहरू होते. अलिप्तता हा शब्दप्रयोग सर्वप्रथम पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १९५४ मध्ये कोलंबोतील एका भाषणात केला. होकारात्मक तटस्थता असा अलिप्तवादाचा अर्थ लावता येईल.

**अलिप्तता चळवळीची सुरुवात :**

दुसऱ्या महायुद्धानंतर म्हणजे, १९४५ नंतर जगात अनेक देशांची वाताहतवादाच्या जोखडातून मुक्तता झाली. त्यांना स्वातंत्र्य मिळाले. यात आफ्रिका आणि आशिया खंडातल्या देशांची संख्या मोठी होती. याचवेळी राजकीय जगाची रचना दोन ध्रुवांवर आधारून होत होती. संयुक्त राज्य अमेरिका आणि सोव्हिएत युनियन हे दोन ध्रुव होते.

जगातले देश दोन गटांमध्ये विभागले जाण्याची प्रक्रिया सुरू होती. अधिकाधिक लष्करी सामर्थ्य आणि राजकीय विचारसरणी हे या नव्या जगाचे आधारस्तंभ होते. यावरून या दोन भिन्न विचारसरणीच्या गटांत अघोषित स्पर्धा सुरू झाली. त्यास शीतयुद्ध म्हटले जाते.

अधिकाधिक देशांना आपल्या गटात सहभागी करून घेण्याचे प्रयत्न या दोन्ही गटांकडून सुरू झाले.

आशिया आणि आफ्रिकातल्या नुकत्याच स्वतंत्र झालेल्या किंवा होत असलेल्या अनेक देशांपुढे त्यांचे स्वतःचे प्रश्न होते. ब्रिटिश साम्राजाच्या जोखडातून स्वतंत्र झालेल्या भारतापुढे बहुतांश निर्धन, अशिक्षित लोकसंख्येच्या देशाला योग्य मार्गावर तसेच प्रगतीच्या दिशेने जाणे आवश्यक व महत्त्वाचे होते. त्यामुळे एका विचारप्रणालीवर आधारित कोणत्याही गटात सहभागी होण्यापेक्षा आधी स्वतःपुढचे प्रश्न सोडविण्यात भारताला अधिक स्वारस्य होते. अशीच स्थिती अनेक देशांची होती. त्यामुळे जगातील प्रबळ अशा दोन्ही गटांच्या प्रभावापासून अंतर राखून शांततामय सहकार्याच्या मार्गाने आपली वाटचाल सुरू ठेवायची. असा मतप्रवाह भारतासह अनेक देशांच्या सत्ताधारी वर्तुळात होता. या मताचा जगात स्पष्टपणे उच्चार हा पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केला.

१९५५ मध्ये आशिया-आफ्रिकातील राष्ट्रांची महत्त्वपूर्ण परिषद इंडोनेशियातील बांडुंग येथे पार पडली. ही चळवळ अलिप्तवादी चळवळीच्या प्रारंभीची सर्वात मोठी घटना मानली जाते. या परिषदेत अलिप्ततावादी विचारांचा आणि या विचारांवर आधारित एखादी संघटना किंवा विचारसरणी विकसित करण्याचा विचार झाला. यानंतर १९६१ मध्ये बेलग्रेड येथे अलिप्ततावादी विचारसरणीच्या पुरस्कर्त्यांची पहिली बैठक झाली आणि याच बैठकीत अलिप्त राष्ट्र गट चळवळीची अधिकृत स्थापना झाली. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल

नेहरू, इजिप्तचे अध्यक्ष अब्दुल गमाल नासेर, युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टिटो, इंडोनेशियाचे अध्यक्ष सुकानी हे अलप्ततावादी चळचळीचे प्रणेते असून, यांच्याच नेतृत्त्वाखाली अलिप्त राष्ट्र चळवळ/संघटना निर्माण झाली.

शीतयुद्धाच्या काळात दोन्ही महासत्तांच्या कट-कारस्थानं आणि कुटिल डावपेचांमुळे जगभर वातावरण तणावपूर्ण बनलेले असताना भारत आणि समविचारी नवस्वतंत्र आणि विकसनशील देशांचा आवाज दाबला जाऊ लागला. त्यामुळे ज्या राष्ट्रांना या दोन्ही गटात सहभागी व्हायचं नव्हतं ती सर्व राष्ट्रे अलिप्ततावादी चळवळी झेंड्याखाली आली. आज संघटनेत १२५ सदस्य देश असून, दर तीन वर्षांनी या संघटनेची बैठक होत असते.

**अलिप्ततावादी चळवळीची उद्दिष्ट्ये :**

अलिप्ततावादी चळवळीची/संघटनेची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

१. कोणत्याही सत्ता गटाशी जोडून न घेणे.
२. विकसनशील राष्ट्रांचा आवाज बुलंद करणे.
३. जगातील शस्त्रस्पर्धा कमी करणे तसेच युद्ध टाळणे.
४. स्वतंत्र परराष्ट्र धोरण आखण्याचे स्वातंत्र्य जपणे.
५. जगात सत्तासंतुलन राहावं यासाठी प्रयत्न करणे.
६. जागतिक शांतता राखणे. इ.

अलिप्त राष्ट्र चळवळीतील सदस्य देशांचा मुख्य भर हा स्वयंनिर्णय, देशांचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, वर्णभेदाला विरोध करणे तसेच वसाहतवाद आणि नववसाहतवादाच्या विरोधात संघर्ष करणे, वंशवादाला विरोध, निःशस्त्रीकरण, सर्व देशांचे शांततामय सहअस्तित्त्व मान्य करणे आदि अनेक मुद्यांचाही चळवळीच्या उद्दिष्टांत समावेश होतो.

या धोरणाला अनुसरून अलिप्त राष्ट्र चळवळीने शीतयुद्धाच्या काळात महत्त्वाची भूमिका बजावली. विशेषतः दोन प्रबळ राष्ट्रांत सहभागी होण्यास उत्सुक नसलेल्या तिसऱ्या जगातील अनेक देशांना स्वतंत्रपणे वाटचाल करण्यासाठी आवश्यक ते बळ अलिप्त राष्ट्र चळवळीने दिलं.

**शीतयुद्धातील अलिप्ततावादी चळवळ :**

अलिप्ततावादाच्या पर्यायांचा मोठा फायदा भारताला शीतयुद्धाच्या काळात झाला आहे. नव्याने स्वतंत्र झालेल्या भारतापुढे विकासाचे अनेक सामाजिक, आर्थिक प्रश्न होते.

त्यामुळे विकास साधण्यासाठी कुठल्याही संघर्षात न पडता अलिप्त राहून आपला विकास साधावा, असे भारताला वाटले. या अलिप्ततावादामुळेच भारताला आपल्या परराष्ट्र धोरणामधील स्वायत्तता टिकवून ठेवता आली आणि शीतयुद्धादरम्यान भारताना एक नवीन स्वतंत्र ओळख मिळाली. त्याचबरोबर अमेरिका आणि सोव्हिएत संघाबरोबर मैत्रीपूर्ण संबंध ठेवून, आपल्या आर्थिक विकासावर लक्ष केंद्रित करता आले. भारताने अलिप्ततावादाचा स्वीकार केला असला, तरी याच काळात भारताच्या भूमिकेवर सुद्धा प्रश्न उपस्थित केला गेला. सन १९७१ च्या भारत आणि सोव्हिएत रशियामधील आणि सहकार्याविषयीच्या कराराने भारतावर शंका उपस्थित केली गेली. त्याचप्रमाणे १९७४ मधील अणुपरीक्षण, अण्वस्त्र-प्रसार बंदी करारावर भारताने स्वाक्षरी करण्यास दिलेला नकार, बांग्लादेश युद्धामधील भारतीची भूमिका, श्रीलंकेतील भारताचा लष्करी हस्तक्षेप या गोष्टी स्पष्ट करतात की, भारताने वेळोवेळी जी समस्या आली, त्या समस्येनुसार तत्कालीन योग्य परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल आपल्या अलिप्ततावादी धोरणात करत आपले राष्ट्रीय हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न केलेला आहे. एकंदरित भारतासाठी अलिप्ततावाद हे राष्ट्रीय हितसंबंध साधण्याचे एक प्रभावी राष्ट्रीय सुरक्षा धोरण होते.

शीतयुद्ध काळात अमेरिका आणि भारताचे परराष्ट्र धोरण नेहमीच परस्पर हितसंबंधांना छेद देणारे राहिले. त्यामुळेच जागतिक दोन सर्वांत मोठ्या लोकशाहीवादी राष्ट्रांमध्ये मैत्री होऊ शकली नाही. असे असतानाही उभयदेशांत सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक क्षेत्रात देवाण-घेवाण होत राहिली.

भारत १९४७ साली स्वतंत्र झाला त्यावेळी जगाची वाटणी दोन प्रमुख गटांमध्ये झाली होती. अमेरिका प्रेरित भांडवलशाही गट आणि दुसरा रशिया प्रेरित साम्यवादी गट.

या दोन्ही गटांमध्ये छोट्या, प्रभावहीन आणि नवीन स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना काही आमिषे दाखवून आपल्या गटामध्ये सामील करून घेण्यासाठी स्पर्धा लागली होती. नवस्वतंत्र भारतासाठीही हा पेचप्रसंग होता. दोन्ही गट भारतावर दबाव टाकत होते. परंतु, गटामध्ये सामील होणे म्हणजे, आपल्या राष्ट्राचे सार्वभौमत्व व स्वातंत्र्य हिरावून जाणे हे निश्चित होते. त्यावेळेस भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी नम्रपणे दोन्ही गटांना नकार दिला आणि दोन्ही राष्ट्रापासून अलिप्त राहण्याचा निर्णय घेतला.

अलिप्ततावादी तत्त्वाच्या विपरोक्ष जरी भारताने आपल्या परराष्ट्र धोरणाच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेतलेले असले, तरी भारताने अलिप्ततावादी विचारसरणीचा पूर्णपणे त्याग केलेला नाही, याची अनेक उदाहरणे देता येतील. भारताने संयुक्त राष्ट्र संघटनेत अमेरिका-इराणच्या प्रश्नावर अमेरिकेची जरी साथ दिली असली, तरी इराणवर आर्थिक बहिष्कार टाकण्याच्या अमेरिकेच्या आवाहनाला

आणि दबावाला भारत बळी पडला नाही. अफगाणिस्तान व इराकमध्ये भारताने आपले शांतीसैनिक पाठविण्यास स्पष्टपणे नकार दिला. भारत-अमेरिका मैत्री जरी चीनविरोधात विकसित झाली असली, तरी तैवानच्या प्रश्नावर भारताने अमेरिकेची साथ दिली नाही. यावरून भारताने आपल्या परराष्ट्र धोरण निर्णय प्रक्रियेतील स्वयत्तता, स्वतंत्रता टिकवली हे स्पष्ट होते.

**शीतयुद्धोत्तर अलिप्ततावाद :**

सन १९९१ मध्ये सोव्हिएत युनियनचे विघटन झाले आणि शीतयुद्ध संपले.

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर अमेरिका या एकाच महासत्तेचा अंमल जगावर प्रस्थापित झाला आणि जागतिक राजकारणात एकध्रुवीय व्यवस्थेचा उदय झाल्यासारखे चित्र निर्माण झाले.

त्याचवेळेस जगात जागतिकीकरण आणि आर्थिक उदारीकरणाचे वारे वाहत होते आणि हीच वेळ अलिप्ततावादी चळवळीची दिशा बदलणारी ठरली.

अनेक राष्ट्रांनी आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी आर्थिक उदारीकरणाच्या प्रक्रियेचा अवलंब करून आपली अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेला जोडण्याचा प्रयत्न केला.

एकाच भू-भागातील देशांनी व्यापार गट तयार केले. असे गट जगाच्या सर्व भागात तयार झाले असले, तरी या गटांच्या रचनेत आणि उद्दिष्टांमध्येही खूप वैविध्य होते.

भौगोलिक शेजारी असलेल्या देशांनी एकत्र येवून आपापसात व्यापार वाढवावा आणि जगातील इतर देश किंवा गटांशी एक गट या नात्याने आर्थिक स्वरूपाचे करार करावेत ही संकल्पना मोठ्या प्रमाणात स्वीकारली गेली. आशिया, आफ्रिका, यूरोप, दक्षिण अमेरिका अशा अनेक खंडांमध्ये देशांचे व्यापारगट तयार झाले. भारत, पाकिस्तान, बांग्लादेश, श्रीलंका, भूतान, मालदीव, या दक्षिण आशियाई राष्ट्रांनी १९८५ मध्ये स्थापन केलेली सार्क संघटना याचे उदाहरण देता येईल.

शीतयुद्धाच्या काळात किंवा त्यापूर्वी राजकीय विचारप्रणाली आणि लष्करी सामर्थ्य हे दोन घटक आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये महत्त्वाचे मानले गेले. परंतु, शीतयुद्ध संपण्याच्या सुमारास आणि त्यानंतर या घटकांच्या बाबतीतही एक महत्त्वाचा बदल घडत गेला, तो म्हणजे आर्थिक घटकाला महत्त्व आले आणि अनेक देशांनी आपल्या राजकीय विचारसरणीपेक्षा व्यक्तिगत आर्थिक हितसंबंधांना महत्त्व दिले. व्यापारसंघाच्या, व्यापार गटांच्या माध्यमातून प्रादेशिकतावादी, व्यक्तिगत आर्थिक हिताची भावना आशिया, आफ्रिका राष्ट्रांमध्ये विकसित होत गेली, हा अलिप्ततावादी चळवळीला बसलेला मोठा धक्का होता.

१९९५ मध्ये अण्वस्त्र प्रसारबंदी कराराला मुदतवाढ देण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघात मतदान घेण्यात आले. या कराराला मुदतवाढ मिळावी या बाजूने आशिया, आफ्रिका खंडांतील देशांनी मतदान केले. हा अलिप्ततावादी चळवळीला बसलेला मोठा धक्का होता.

संपूर्ण निःशस्त्रीकरण हे अलिप्ततावाद चळवळीचे प्रमुख तत्त्व होते. भारत आपल्या निःशस्त्रीकरणाच्या भूमिकेवर ठाम राहिला आणि भारताने या करारावर स्वाक्षरी केली नाही. अलिप्ततावादी चळवळीमध्ये फूट पडल्याचे याप्रसंगी जाणवले.

निःशस्त्रीकरणसारख्या महत्त्वाच्या मुद्यांवर अलिप्ततावादी राष्ट्रांचे एकमत नव्हते, हा अलिप्ततावादी विचारसरणीचा पराभव होता.

१९९६ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेच्या हंगामी सदस्य पदासाठी भारत आणि जपान यांच्यामध्ये झालेल्या निवडणुकीत अलिप्ततावादी राष्ट्रांनी जपानच्या बाजूने मतदान करून भारताचा पराभव घडवून आणला. यातून अलिप्ततावादी राष्ट्रांमध्ये सामुहिक हितापेक्षा व्यक्तिगत हितसंबंधांचे रक्षण महत्त्वाचे आहे, असे स्पष्ट झाले.

१९९८ मध्ये भारताने पाच अणुचाचण्या करून स्वतःला अण्वस्त्रधारी राष्ट्र म्हणून घोषित केले. ज्या निःशस्त्रीकरणाच्या तत्त्वावर भारत ठाम होता त्याच तत्त्वाला भारताकडून अणुचाचणी करून छेद देण्यात आला. भारताने घेतलेल्या या निर्णयाला दक्षिण आशियातील बदलती समीकरणे जरी जबाबदार असली, तरी हा निर्णय अलिप्ततावादी विचारधारेच्या विरूद्ध जाणारा होता.

शीतयुद्धातील आणि शीतयुद्धोत्तर अनेक घटनांनी अलिप्ततावादी चळवळ केवळ नामधारी बनली होती. अलिप्ततावादी संघटनेच्या व्यासपीठावरून अनेक निर्णय, ठराव मंजूर झाले. पण, त्यांची अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळेच तीस-या जगातील विकसनशील, विकसित आणि गरीब राष्ट्रांमध्ये देखील सहकार्य प्रस्थापित करण्यात अलिप्ततावादी संघटनेला अपयश आले.

**शांतता आणि सुरक्षितता :**

भारताने अलिप्त धोरणाचा स्वीकार केला आणि जगात शांतता आणि सुव्यवस्था, संपन्नता निर्माण होण्यासाठी हेच धोरण कसे उपयुक्त आहे, हे पटवून दिले. गटातटाचे राजकारण नसल्यामुळे जगात शांतता आणि सुरक्षिततेचे वातावरण निर्माण होईल, हे सुद्धा पटवून दिले. उदा. २३ मे, १९८४ रोजी भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी जगातील चार अन्य महत्त्वाच्या नेत्यांबरोबर

विश्वशांतीसाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले होते.

**अलिप्ततावादी चळवळीची उपयुक्तता :**

सध्याच्या परिस्थितीत अलिप्ततावादी चळवळ उपयुक्त आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जातो. यास अनेक कारणेही सांगितली जातात. दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या दोन महासत्ता, त्यांच्यातील संघर्ष, शीतयुद्ध, लष्करी करार व अण्वस्त्र स्पर्धा इत्यादींमुळे अलिप्ततावादी चळवळीची आवश्यकता होती. परंतु, आता मात्र, आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील परिस्थिती बदलली आहे. अमेरिका ही एकमेव महासत्ता अस्तित्वात असणे इत्यादी कारणांमुळे अलिप्ततावादी गटाची उपयुक्तता उरली नाही, असे म्हटले जाते. मात्र, असे जरी असले तरी आजही अलिप्ततावादी चळवळ उपयुक्त आहे. कारण सध्याची विश्वरचना एककेंद्री व अमेरिकेभोवती सत्तेचे विकेंद्रीकरण करणारी आहे. यासाठी सर्व आशिया, आफ्रिका राष्ट्रांनी एकत्र येणे आवश्यक आहे.

शीतयुद्ध संपुष्टात आले तरीही या चळवळीचे महत्त्व कमी झालेले नाही.

मानवतावाद, जागतिक शांतता व समानता या मूल्यांवर अलिप्ततावादी चळवळ आधारलेली आहे. या चळवळीने अल्पविकसित राष्ट्रांना एकत्र येण्यास प्रेरित करून त्यांचा विकास करण्यासाठी प्रयत्न केले. आंतरराष्ट्रीय प्रश्न युद्धाच्या मार्गाने न सोडविता शांततेच्या मार्गाने सोडविण्यावर या चळवळीने भर दिला. नि:शस्त्रीकरण, मानवी हक्कांचे संवर्धन याबाबत आग्रही भूमिका घेतानाच अलिप्ततावादी चळवळीने गरीब व अविकसित राष्ट्रांच्या समस्या जगासमोर मांडल्या.

अलिप्ततावादी चळवळीने आर्थिक व सामाजिक बदलांचे अनेक प्रवाह आंतरराष्ट्रीय राजकारणात आणले. अलिप्ततावादी विचारसरणीची राजकीय चळवळ व आर्थिक आणि सामाजिक चळवळ अशा दोन पद्धतीने विकास घडून आला. अलिप्ततावादी चळवळीची राजकीय उद्दिष्ट्ये पूर्ण झालेली असली तरी बहुसंख्य आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्ट्ये अद्यापही पूर्णत्वाला आलेली नाहीत. परिणामी अलिप्ततावादाची एक आर्थिक व सामाजिक चळवळ म्हणून उपयुक्तता आजही आहे.

भारताला अलिप्ततावादाकडे आपले परराष्ट्र धोरण म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन आजही उपयुक्त आहे. भारतासह प्रत्येक राष्ट्राला आपल्या परराष्ट्र धोरण क्षेत्रातील आपले निर्णय स्वतंत्रपणे घेता येणे आवश्यक आहे. अमेरिकेच्या वाढत्या एकाधिकारशाहीमुळे अनेक राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणातील निर्णय स्वातंत्र्याला धोका निर्माण झाला आहे. अशा प्रसंगी परराष्ट्र धोरणांचा एक पर्याय म्हणून अलिप्ततावादाचे धोरण उपयुक्त ठरणार आहे.

**संदर्भ ग्रंथसूची :**

१. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, भारतीय परराष्ट्र धोरण, प्रतिभा प्रकाशन, मुंबई.

२. O.P. Sabherwal, "India and NAM", World Focus, Special Issue on Non-Aligned Movement.

३. डॉ. बी.डी. तोडकर, आंतरराष्ट्रीय राजकारण, प्रशांत प्रकाशन, जळगाव

४. M.S. Rajan, Recent Essays on India's Foreign Policy, Delhi: Kalinya Publishers.

५. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, नव्या समीकरणांच्या दिशेने, पुढारी.

६. डॉ. चंद्रशेखर दिवाण, भारताची विदेश नीती, विद्या प्रकाशन, नागपूर

⌘⌘⌘

Moral and ethical values are the key virtues of education sector which help to improve the quality in higher education. Moral and ethical education through educational policies, programmes and practices help students to develop their depth of knowledge and awareness of their own culture. This paper examines the importance of ethical and moral values while imparting highest quality in education system. Nowadays Universities are neglecting moral and ethical values and paying attention on efficiency only. Dishonest and disrespectful leaders are the outcome of deteriorating quality in higher education in India. In recent education system moral and ethical issues have been made mandatory. Students get an opportunity to develop their critical stance through ethical and moral research in contemporary societies.

Indexed

IMPACT 8.14 ijjif FACTOR

**Publisher & Owner**
Archana Rajendra Ghodke
Harshwardhan Publication Pvt Ltd
At.Post Limbaganesh, Tq.Dist.Beed 431 126
(Maharashtra) Mob 09850203295
E-mail: vidyawarta@gmail.com
www.vidyawarta.com

**Edit By**
Dr. Gholap Bapu Ganpat
Parli Vaijnath, Dist.Beed 431 515
(Maharashtra, India)
Cell +91 75 88 05 76 95

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318